(३०)

Exh. 15

रेग्युलर कज्जा नंबर ५२/२०२६

मे. दिवाणी न्यायाधिशसो क. स्तर, कागल, तालुका कागल,

यांचे कोर्टात-

| | |
|---|---|
| श्री. आनंदा पांडुरंग मांडवकर वगैरे | वादी |
| वि | |
| श्री. शिवाजी धोंडी मांडवकर वगैरे | प्रतिवादी |

यांतील वादी यांनी दाखल केलेले कागदपत्रांची यादी खालीलप्रमाणे आहे.

Order
Seen
Dt. 31.7.26

| अ.नं. | कागदपत्रांचे तपशिल | तारीख | शेरा. |
|---|---|---|---|
| १. | रेग्युलर कज्जा नंबर १७/२०२० मधील हुकूमनामा | ०१/०८/२०१४ | स.शिक्केचा |
| २. | रेग्युलर कज्जा नंबर १७/२०२० मधील तडजोडपुरसीस | ०१/०८/२०१४ | स.शिक्केचा |

कागल. मे. जा. व्हावे.

तारीख ३१/०७/२०२६

MADKE AJIT BHISHMA

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.07.31 17:35:17 +0530

उतारा. १
नकलेचा दाखला

मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, कागल यांचे
न्यायालयात.....

दिवाणी व फौजदारी नक्कल रजिस्टर नंबर - ५५६/१४

| | | |
|---|---|---|
| अर्जदाराचे नाव | ॲड. मोहन हिंदुराव पाटील | |
| नक्कल अर्ज दाखल तारीख | पंचवीस २५ / सहा ६ / २०१४ | सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर, कागल. |
| अर्ज तयार तारीख | एक १ / ऑगस्ट ८ / २०१४ | |
| अर्जदाराला नक्कल घेवुन जाणेसाठी समज दिलेली तारीख | एक १ / ऑगस्ट ८ / २०१४ | |
| नक्कल तयार तारीख | एक १ / ऑगस्ट ८ / २०१४ | |
| नक्कल दिली तारीख | एक १ / ऑगस्ट ८ / २०१४ | |
| झेरॉक्स नक्कल नि. ६० | | |

| एकुण पाने | पानाचा झेरॉक्स दर | एकुण रक्कम |
|---|---|---|
| १२ | ४ | ४८=०० |

तडजोड हुकूमनामा

दावा दाखल तारीख: २१/०१/२०१०

दावा नोंदणी तारीख: २१/०१/२०१०

दावा निकाल तारीख: २३/०६/१४.

मे. सहदिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल

यांचे कोर्टात......

रेग्यु. कज्जा नंबर: १७/२०१०

नि.६०/अ

| | |
|---|---|
| १) वजरंग संभाजी मांडवकर,<br>व.व.४२, धंदा.शेती,<br>रा.वाळवे खुर्द, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर<br>२) श्रीमती शिला संभाजी मांडवकर,<br>व.व.६०, धंदा.घरकाम,<br>रा.सदर<br>३) सौ.अंजना वाजीराव खापरे,<br>व.व.३७, धंदा.घरकाम,<br>रा.मडीलगे खुर्द, ता.भुदरगड,<br>जि.कोल्हापूर<br>४) सौ.सुमन शांताराम पाटील,<br>व.व.३३, धंदा.घरकाम,<br>रा.मोघरडे, ता.राधानगरी,<br>जि.कोल्हापूर | } वादी |

विरूद्ध

| | | |
|---|---|---|
| १) पांडुरंग धोंडीराम मांडवकर,<br>व.व.७०, धंदा.शेती,<br>रा.वाळवे खुर्द, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर<br>२) शिवाजी धोंडीराम मांडवकर,<br>व.व.६२, धंदा.शेती,<br>रा.सदर,<br>३) सखुबाई तुकाराम माजगांवकर,<br>व.व.सज्ञान, धंदा.घरकाम,<br>रा.बोरवडे, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर<br>४) जनाबाई दिनकर पाटील,<br>व.व.सज्ञान, धंदा.घरकाम,<br>रा.पिराचीवाडी, ता.कागल,<br>जि.कोल्हापूर | } | प्रतिवादी |

दावा : दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून त्याचा तुटक व पृथक कब्जा मिळणेसाठी दाव्याची सर्व कारणाकरीता आकारणी रूपये ७,२५२-६० पैसे

यातील वादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते पुढीलप्रमाणे :

१. दावा मिळकतीचे वर्णन :

अ) शेतजमीनी - वाळवे खुर्द, ता. कागल, जि. कोल्हापूर येथील पुढील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती

| अ. नं. | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. | पैकी क्षेत्र हे. आर. | हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३८६ | ०-२८.२ | १-७३ | ०-१४.१ | ३/१० |
| २ | ३९८ | ०-२९ | ०-३७ | ०-१४.५ | ३/१० |
| ३ | ४१३ | ०-२४ (०-०१) | १-६८ | ०-१२ | ३/१० |
| ४ | ४२० | ०-३१ | ०-२२ | ०-११ | ३/१० |
| ५ | ४२८ | ०-२१ | १-२१ | ०-१०.५ | ३/१० |
| | | | ४-२१ | | |

ब) घर मिळकत -


वाळवे खुर्द, ता. कागल, जि. कोल्हापूर येथील पुढील वर्णनाची मिळकत सन २००९-२०१० सालचे असेसमेंट उताऱ्याप्रमाणे अनु. नंबर १४९ मिळकत नंबर १०९/१ ही सिंगल कौलारू रूपकाम असलेली घर मिळकत तिचे बांधीव क्षेत्र अंदाजे ४०० चौ. फूट व खुली जागा अंदाजे ५०० चौ. फूट याची अंदाजे किंमत रूपये २१,०००/- (रूपये एकवीस हजार फक्त)

येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकती या दाव्याच्या कामी दावा मिळकत म्हणून संबोधलेल्या आहेत.

२. वादी, प्रतिवादीची या दाव्याच्या कारणापुरती वंशावळ पुढीलप्रमाणे :

धोंडीराम (मयत १९८१ पुर्वी)

धोंडीरामची पत्नी धोंडीरामाचे पुर्वीच मयत (मृत्यू दाखला प्राप्त होत नाही)




येणेप्रमाणे वादी, प्रतिवादी यांची या दाव्याच्या कारणापुरती वंशावळ आहे.

३. दावा अर्जी कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकती वादी प्रतिवादींच्या वाडवडिलार्जित मालकी व कब्जेवहिवाटीच्या मिळकती असून दावा मिळकतीमध्ये वादींचा १/३ इतका हिस्सा आहे. वादी नंबर १ चे वडील १९८२ साली मयत झाले आहेत. वादी, प्रतिवादीचे कुटूंब खुप पुर्वी पासून स्वतंत्र आहे. त्यांचे राहणे, व्यवहार देखील स्वतंत्र, स्वतंत्र असे आहेत. वादी प्रतिवादींच्या दावा मिळकती शिवाय अन्य काहीही स्थावर अगर जंगम मिळकती नाहीत. जंगम मिळकती अगदी तुटपुंज्या होत्या. त्यांचे आपसात १९८२ सालामध्ये वाटप झाले आहे.

४. दावा अर्जी कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये वादींचा १/३ इतका हिस्सा आहे. प्रतिवादी नंबर १ यांना चार मुले आहेत. वादी गरीब स्वभावाचे असून त्यांना कोणाचेही पाठबळ नाही याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी नंबर १ व २ वादींना नाहक त्रास देत आहेत. दावा मिळकतीमध्ये वादींच्या हिस्से इतके क्षेत्र वहिवाटणेस वादींना प्रतिवादी नंबर १ व २ हरकत करीत आहेत. दावा मिळकतीमधील वादींनी आपल्या हिश्याची मागणी प्रतिवादी नंबर १, २, यांचेकडे केली असता प्रतिवादींनी वादींचा हिस्सा वाटप व तुटक करून देणेस नकार देवून वादींना त्यांचा हिस्सा तुटक करून देणेस स्पष्टपणे नाकारले. वादींना दावा मिळकती एकत्रात ठेवणेच्या नाहीत. त्या कारणाने दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून त्याचा तुटक व पृथक कब्जा मिळणेसाठी वादींना प्रतिवादी विरूद्ध हा दावा मे.कोर्टामध्ये दाखल करणे भाग पडले आहे.

५. <u>दाव्यास कारण :</u>

मे.कोर्टाच्या स्थळसिमेत वादींनी प्रतिवादी नंबर १ व २ कडे दावा मिळकतीच्या वाटपाची मागणी डिसेंबर २००९ मध्ये केली. त्यावेळी दाव्यास कारण घडले आहे व घडत आहे म्हणून व या दाव्याच्या स्वरूपावरून हा दावा मे.कोर्टामध्ये चालणेस पात्र आहे.

६. <u>दाव्याचा तपशील :</u>

| रूपये पैसे | |
|---|---|
| २५२६-६० | दावा अर्जी कलम १ अ मधील शेतजमीनीचा एकूण आकार रूपये ४-२१ पैसे इतका असून त्यामधील वादीचा ३/१० हिस्सा १ रूपये २६ पैसे आकार त्याचे २०० पट आकारणी सदरी दाखल |
| ७,००० - ०० | दावा अर्जी कलम १ (ब) मधील मिळकतीची अंदाजे किंमत रूपये ३०,०००/- त्यामधील वादींचा १/३ हिस्सा त्याची आकारणी सदरी दाखल |
| ७,२५२-६० | एकूण दाव्याची आकारणी केली असून त्यावर मुंबई कोर्ट फी कायदा कलम ६(vii) प्रमाणे केली असून त्यावर जरूर तो कोर्ट फी स्टॅम्प दिला आहे व दाव्याची आकारणी सुट व्हॅल्यूएशन ॲक्टचे कलम ८ व ९ प्रमाणे केली आहे. |

७. दावा घर मिळकतीमध्ये प्रतिवादी नंबर ३ व ४ यांना काहीही हिस्सा प्राप्त होत नाही. त्या कारणाने वादींनी सदर मिळकतीमध्ये १/३ हिश्याची मागणी केली आहे.

८. वादी, प्रतिवादी, दावा मिळकत व दाव्यास कारण मे. कोर्टाच्या स्थलसिमेत घडले असलेने हा दावा चालविण्याचा मे. कोर्टाना हक्क व अधिकार आहे.

९. वादींनी यापुर्वी प्रतिवादी, वादी विरूद्ध अशा स्वरूपाचा दावा अन्य कोणत्याही कोर्टात दाखल केलेला नाही.

१०. <u>सबब वादीची विनंती की,</u>

अ) दावा अर्जी कलम १ यात वर्णन केलेल्या शेत जमीन मिळकतीमध्ये वादींना ३/१० इतका हिस्सा व १ ब या मिळकतीमध्ये १/३ हिस्सा अगर कोर्ट निर्णयांती जो काही हिस्सा ठरेल तो वादींना मे. कोर्टामार्फत तुटक व पृथक होवून मिळावा व तसा ठराव व हुकूमनामा व्हावा. दावा मिळकतीचे कायदेशिर तुटक वाटप होत नाही असे झालेस हिस्सेचे क्षेत्र व चतु:सिमा निश्चित होवून तसा आदेश व्हावा.

ब) पार्टीशन ॲक्ट मधील तरतुदींचा विचार याच कामी वादींच्या वतीने व्हावा.

क) दाव्याचा कोर्ट खर्च वादींना प्रतिवादी कडून मिळावा.

ड) जरूर तर दावा दुरूस्तीस मे. कोर्टाची परवानगी असावी.

...... येणेप्रमाणे असे.

आज दिनांक २३/०६/२०१४ इ. रोजी सदरचा दावा सह. दिवाणी न्यायाधिश,(श्रीमती म.ना.चव्हाण)कनिष्ठ स्तर, कागल यांचेसमोर वादी तर्फे वकील श्री. के.के.सासवडे प्रतिवादी नं २ तर्फे श्री.ए.के.कापसे व प्रतिवादी नं. ४ तर्फे श्री.एम.एच.पाटील यांचे समक्ष आपसात तडजोडीने अंतिम निकालात निघाला असून त्यांचे दरम्यान झालेली आपसात तडजोड पुरसीस पुढीलप्रमाणे–

वादींनी प्रस्तुतचा दावा प्र.वादींविरुध्द वाटपासाठी व कायम मनाई तालीद होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी,प्र.वादींनी आपले नातेसंबंध विचारात घेवून व भविष्यात भाउबंदामध्ये वाद होवू नयेत म्हणून समझोत्याने आपसात तडजोड केली असून आपसात तडजोडीने वादी, प्रतिवादींना मिळालेल्या मिळकतींचा तपशिल पुढीलप्रमाणे–

१. यातील वादी बजरंग संभाजी मांडवकर वगैरे ४ यांना वाटपामध्ये मिळालेल्या मिळकतींचा तपशील पुढीलप्रमाणे–

अ. दावा अर्जी कलम १ अ यात वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीपैकी वाळवेखुर्द ता.कागल जि.कोल्हापूर येथील पुढील शेतजमीनी वादींना या आपसात तडजोडीने मिळाल्या आहेत.

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे.आर. | पैकी क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|
| १. | ३९८ | ०.२९ | पुर्ण |
| २. | ४२० | ०.३१ | ०.२२.५ |

सदर वादींना मिळालेल्या मिळकतींच्या चतु:सिमा–


पुर्वेस– बापु म्हादु मांडवकर यांची जमीन

पश्चिमेस– शंकर जिवबा तानवडे यांची जमीन

दक्षिणेस– पांडुरंग व शिवाजी धोंडिराम मांडवकर यांना याच गट नंबरमधील वाटपामध्ये मिळालेली हे ०.०८.५ आर क्षेत्राची मिळकत.

उत्तरेस– नारायण बाबुराव मांडवकर यांची मिळकत.

समजुतीसाठी वादींना गट नंबर ४२० मधील हे. ०.२२.५ आर क्षेत्राच्या मिळालेल्या मिळकतीचा बिनस्केली नकाशा पुढीलप्रमाणे–




ब. दावा अर्जी कलम १ (ब) या सन २००१–२००२ सालच्या असेसमेंट उता–याप्रमाणे अ.नं. १६८ मिळकत नं. १०९ या सिंगल कौलारु रुफकाम असलेल्या मिळकतीपैकी पश्चिम बाजुची निम्मया हिश्याची मिळकत व त्यावरील २०० चौ.फुट क्षेत्राची बांधकाम मिळकत व अंदाजे २५० चौ.फुट क्षेत्राची खुली जागा वादींना वाटपामध्ये मिळाली आहे.

अशा मिळकती वादींना वाटपामध्ये या आपसात तडजोडीने मिळालेल्या असून त्यांचा प्रत्यक्ष व खुला कब्जादेखील वादींना प्र.वादींना दिला आहे. कब्जाबाबत वादींची कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

२. यातील प्र.वादी पांडुरंग धोंडिराम मांडवकर व शिवाजी धोंडिराम मांडवकर यांना वाटपामध्ये मिळालेल्या मिळकतीचा तपशिल पुढीलप्रमाणे–

अ. दावा अर्जी कलम १(अ) यात वर्णन केलेल्या शेतजमीन मिळाकतीपैकी वाळवेखुर्द ता. कागल जि.कोल्हापूर येथील पुढील शेतजमीनी प्र.वादी नं. १,२ यांना या आपसात तडजोडीने मिळाल्या आहेत.

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे.आर. | पैकी क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|
| १. | ३८६ | ०.२८.२ | पुर्ण |
| २. | ४१३ | ०.२४ (पो.ख. हे.०.०१) | पुर्ण |
| ३. | ४२० | ०.३१ | ०.०८.५ |

(सदर मिळकतीचा समजुतीसाठीचा नकाशा वादींना मिळालेल्या मिळकतीच्या तपशिलामध्ये नमुद आहे.)

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | ४२८ | ०.२१ | ०.१० |

सदर गट नं. ४२८ पैकी हे. ०.१० आर क्षेत्राची मिळकत प्र.वादी नं. १,२ यांना वाटपामध्ये मिळाली आहे तर हे.०७ आर क्षेत्राची मिळकत शासनाने काळम्मावाडी उजवा कालवा यामध्ये संपादीत केली आहे व राहिलेले हे ०.०४ आर क्षेत्राची मिळकत वादींच्या हिस्सेस वाटपामध्ये मिळाली आहे. तथापी ती त्यांनी महिपती म्हादु मांडवकर यांना अलाहिदा विक्री केलेली आहे.

ब. दावा अर्जी कलम १ (ब) या सन २००१—२००२ सालच्या असेसमेंट उता—याप्रमाणे अ.नं. १६८ मिळकत नं. १०९ या सिंगल कौलारु रुफकाम असलेल्या मिळकतीपैकी पुर्व बाजुची निम्या हिश्याची मिळकत व त्यावरील २०० चौ.फुट क्षेत्राची बांधकाम मिळकत व अंदाजे २५० चौ.फुट क्षेत्राची खुली जागा प्र.वादी नं. १,२ यांना वाटपामध्ये मिळाली आहे.

अशा मिळकती प्र.वादी १,२ यांना वाटपामध्ये या आपसात तडजोडीने मिळालेल्या असून त्यांचा प्रत्यक्ष व खुला कब्जादेखील प्र. वादींना वादींनी दिला आहे. कब्जाबाबत प्र.वादींची कोणतीही तकार राहिलेली नाही.

वरीलप्रमाणे वादी प्र.वादी नं १,२ यांना या दाव्यातील मिळकती मालकी हक्काने वाटपामध्ये मिळालेल्या असून त्याप्रमाणे त्यांची प्रत्यक्ष कब्जेवहिवाट आहे. या आपसात तडजोडीने वादी, प्र.वादी. नं. १,

२ यांनी वाद मिळकतीच्या ७/१२ पत्रकी व ग्रामपंचायतीकडील असेसमेंट उता-यास आपल्या नावाच्या नोंदी करुन अंमल करुन घेणेचा आहे. त्याप्रसंगी वादी व प्र.वादी नं. १,२ यांनी एकमेकांना सह्या,संमत्या अशा देणेच्या आहेत.

३. यातील प्र.वादी नं. ३ व ४ सखुबाई तुकाराम माजगांवकर व जनाबाई दिनकर पाटील यांना वादी व प्र.वादी नं. १,२ यांनी त्यांचे दावा मिळकतीमधील हिस्सेपोटी प्र.वादी नं. ३ यांना रु. १०,०००/- व प्र. वादी नं. ४ यांना रु. १०,०००/- असा मोबदला दिला आहे व त्यांनी दावा मिळकतीमधील आपले हक्क वादी व प्र.वादी नं. १,२ यांना सोडून दिले आहेत.

४. वादी,प्र.वादींनी आपसात तडजोडीप्रमाणे प्रत्यक्ष कृती केली असून त्याचा अंमलदेखील केला आहे.

५. वादी,प्रतिवादींनी या दाव्याच्या कामी केलेल्या तक्रारी कायमपणे सोडून दिलेल्या आहेत.

६. दाव्याचा कोर्ट खर्च वादी,प्र.वादींनी आपआपला सोसणेचा आहे.

येणेप्रमाणे वादी,प्र.वादीचे दरम्यान आपसात तडजोड झाली असून त्याप्रमाणे आपसात तडजोड हुकुमनामा करणेत यावा.

येणेप्रमाणे आपसात तडजोड हुकुमनामा असे.

~~दिवाणी दावा नं.~~/रे.क.नं.१७/१० मध्ये निशाण ६०/अ सोबत पुरवणी

<u>खर्चाचा आकडा</u>

| क्र.नं. | तपशील | वादी | प्र.वा. १व२ | प्र.वा.नं.४ |
|---|---|---|---|---|
| १ | दावा अर्जास मुद्रांक | १०३५-०० | — | — |
| २ | वकीलपत्रास मुद्रांक | १०-०० | १०-०० | १०-०० |
| ३ | वकील फी | ५३७-०० | ५३७-०० | ५३७-०० |
| ४ | दाखल केलेल्या कागदास मुद्रांक | ८५-०० | ०५-०० | ०५-०० |
| ५ | आदेशिका लागु करणेस | २०७-०० | — | — |
| ६ | मुदत अर्जास स्टॅम्प | १०-०० | १७०-०० | ९०-०० |
| ७ | कमिशनरची फी | — | — | — |
| | | | | |
| | एकूण...... | १८८४-०० | ७२२-०० | ६४२-०० |
| | वजा न दिलेला खर्च | | | |
| १ | मुदत अर्जास स्टॅम्प | १०-०० | १७०-०० | ९०-०० |
| २ | कोर्ट फी रिफंड | — | — | — |
| | एकूण रुपये | — | — | — |
| | म्हणजेच एकूण रुपये | १८७४-०० | ५५२-०० | ५५२-०० |

आज दिनांक २३ माहे ०६ सन २०१४ इ. रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

(signature) ३/७/१४

(signature)
क.लिपीक

(न.दा. चव्हाण)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कागल

वादी तर्फे वकील — श्री. के.के.सासवडे
प्रतिवादी नं. 2 तर्फे वकील — श्री. ध.के.कापसे
प्र.वा.नं. ४ तर्फे — श्री. एम.एच.पाटील.

(टिप :— या बाबतीतील पक्षकारांना असे कळविण्यात येते की, त्यांनी हजर केलेले दस्तऐवज जर ते (परत) नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपीलाचा निकाल झाल्यावर नाश करून टाकण्यास पात्र ठरतील.)

Read & Compared by (signature)

"True Copy"
(signature)
Asstt. Supdt.
Civil Court, J.D., Kagal

आ. १२
वादी तर्फे दाखल

मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय, कागल यांचे
न्यायालयात.....

दिवाणी व फौजदारी नक्कल रजिस्टर नंबर : ५५६/१४

| | | |
|---|---|---|
| अर्जदाराचे नांव | ॲड मोहन हिंदुराव पाटील | |
| नक्कल अर्ज दाखल तारीख | पंचवीस २५ जून ६ २०१४ २०१४ | सहा. अधिक्षक<br>दिवाणी न्यायालय<br>क.स्तर, कागल. |
| अर्ज तयार तारीख | एक १ ऑगस्ट ८ २०१४ २०१४ | |
| अर्जदाराला नक्कल घेवुन जाणेसाठी समज दिलेली तारीख | एक १ ऑगस्ट ८ २०१४ २०१४ | |
| नक्कल तयार तारीख | एक १ ऑगस्ट ८ २०१४ २०१४ | |
| नक्कल दिली तारीख | एक १ ऑगस्ट ८ २०१४ २०१४ | |
| झेरॉक्स नक्कल नि. ५९ | | |

| एकुण पाने | पानाचा झेरॉक्स दर | एकुण रक्कम |
|---|---|---|
| ७ | ४ | २८.०० |

नि.नं ५१/बी २५

रे. क. नंबर - १७/२०१०

मे. दिवाणी न्यायाधीशसो, क. स्तर, कागल.

यांचे कोर्टात...

बजरंग संभाजी मांडवकर ...... वादी

वगैरे ४

विरुध्द

पांडुरंग धोंडीराम मांडवकर ....... प्र. वादी

वगैरे ४

यातील वादी, प्रतिवादींच्या दरम्यान या दाव्याच्या कामी झालेली आपसात तडजोड पुढीलप्रमाणे -

वादींनी प्रस्तुतचा दावा प्र. वादींविरुध्द वाटपासाठी व कायम मनाई ताकीद होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी, प्र.वादींनी आपले नातेसंबंध विचारात घेवून व भविष्यात भाऊबंदांमध्ये वाद होवू नयेत म्हणून समझोत्याने आपसात तडजोड केली असून आपसात तडजोडीने वादी, प्र.वादींना मिळालेल्या मिळकतींचा तपशील पुढीलप्रमाणे -

१. यातील वादी बंजरंग संभाजी मांडवकर वगैरे ४ यांना वाटपामध्ये मिळालेल्या मिळकतींचा तपशील पुढीलप्रमाणे -

0

Plaintiff no. 1 to 4 are present. They are identified by Adv. A.A. Mahadik. Def. no. 1 to 4 are present. They are identified Adv. M.H. Patil. The contentions of the pursis are read over to them. They have accepted as true and correct. They have further identified their signatures. Hence, the pursis is read and recorded and proper order is passed at Exh. 1.

[signature]
14.6.13

अ. दावा अर्जी कलम १ (अ) यात वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतींपैकी वाळवे खुर्द ता. कागल, जि. कोल्हापूर येथील पुढील शेतजमीनी वादींना या आपसात तडजोडीने मिळाल्या आहेत.

| अ. नं. | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | पैकी क्षेत्र हे. आर |
|---|---|---|---|
| १. | ३९८ | ०.२९ | पुर्ण |
| २. | ४२० | ०.३१ | ०.२२.५ |

सदर वादींना मिळालेल्या मिळकतींच्या चतु: सीमा -


पुर्वेस - बापू म्हादू मांडवकर यांची जमीन

पश्चिमेस - शंकर जिवबा तानवडे यांची जमीन

दक्षिणेस - पांडुरंग व शिवाजी धोंडीराम मांडवकर यांना याच गट नंबरमधील वाटपामध्ये मिळालेली हे. ०.०८.५ आर क्षेत्राची मिळकत

उत्तरेस - नारायण बाबूराव मांडवकर यांची मिळकत

समजुतीसाठी वादींना गट नंबर ४२० मधील हे. ०.२२.५ आर क्षेत्राच्या मिळालेल्या मिळकतीचा बिनस्केली नकाशा पुढीलप्रमाणे -



ब. दावा अर्जी कलम १ (ब) या सन २००१-२००२ सालच्या असेसमेंट उताऱ्याप्रमाणे अ. नं. १६८ मिळकत नं. १०९ या सिंगल कौलारु रुफकाम असलेल्या मिळकतीपैकी पश्चिम बाजूची निम्म्या हिश्श्याची मिळकत व त्यावरील २०० चौ. फुट क्षेत्राची बांधकाम मिळकत व अंदाजे २५० चौ. फुट क्षेत्राची खुली जागा वादींना वाटपामध्ये मिळाली आहे.

अशा मिळकती वादींना वाटपामध्ये या आपसात तडजोडीने मिळालेल्या असून त्यांचा प्रत्यक्ष व खुला कब्जादेखील वादींना प्र.वादींनी दिला आहे. कब्जाबाबत वादींची कोणतीही तक्रार राहीलेली नाही.

२. यातील प्र.वादी पांडुरंग धोंडीराम मांडवकर व शिवाजी धोंडीराम मांडवकर यांना वाटपामध्ये मिळालेल्या मिळकतींचा तपशील पुढीलप्रमाणे -

अ. दावा अर्जी कलम १ (अ) यात वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतींपैकी वाळवे खुर्द ता. कागल, जि. कोल्हापूर येथील पुढील शेतजमीनी प्र.वादी नं. १, २ यांना या आपसात तडजोडीने मिळाल्या आहेत.

| अ. नं. | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | पैकी क्षेत्र हे. आर |
|---|---|---|---|
| १. | ३८६ | ०.२८.२ | पुर्ण |
| २. | ४१३ | ०.२४ (पो. ख. हे. ०.०१) | पुर्ण |
| ३. | ४२० | ०.३१ | ०.०८.५ |
| (सदर मिळकतींचा समजुतीसाठीचा नकाशा वादींना मिळालेल्या मिळकतीच्या तपशीलामध्ये नमुद आहे.) | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | ४२८ | ०.२१ | ०.१० |
| सदर गट नं. ४२८ पैकी हे. ०.१० आर क्षेत्राची मिळकत प्र.वादी नं. १, २ यांना वाटपामध्ये मिळाली आहे तर हे. ०.०७ आर क्षेत्राची मिळकत शासनाने काळमावाडी उजवा कालवा यामध्ये संपादीत केली आहे व राहीलेले हे. ०.०४ आर क्षेत्राची मिळकत वादींच्या हिस्सेस वाटपामध्ये मिळाली आहे. तथापि ती त्यांनी महिपती म्हादू मांडवकर यांना अलाहीदा विक्री केलेली आहे. | | | |

ब. दावा अर्जी कलम १ (ब) या सन २००१-२००२ सालच्या असेसमेंट उताऱ्याप्रमाणे अ. नं. १६८ मिळकत नं. १०९ या सिंगल कौलारु रुफकाम असलेल्या मिळकतीपैकी पुर्व बाजूची निम्म्या हिश्श्याची मिळकत व त्यावरील २०० चौ. फुट क्षेत्राची बांधकाम मिळकत व अंदाजे २५० चौ. फुट क्षेत्राची खुली जागा प्र. वादी नं. १, २ यांना वाटपामध्ये मिळाली आहे.

अशा मिळकती प्र.वादी नं. १, २ यांना वाटपामध्ये या आपसात तडजोडीने मिळालेल्या असून त्यांचा प्रत्यक्ष व खुला कब्जादेखील प्र.वादींना वादींनी दिला आहे. कब्जाबाबत प्र.वादींची कोणतीही तक्रार राहीलेली नाही.

वरीलप्रमाणे वादी व प्र.वादी नं. १, २ यांना या दाव्यातील मिळकती मालकी हक्काने वाटपामध्ये मिळालेल्या असून त्याप्रमाणे त्यांची प्रत्यक्ष कब्जेवहिवाट आहे. या आपसात तडजोडीने वादी, प्र.वादी नं. १, २ यांनी वाद मिळकतीच्या ७/१२ पत्रकी व ग्रामपंचायतीकडील असेसमेंट उताऱ्यास आपल्या नावाच्या नोंदी करुन अंमल करुन घेणेचा आहे.

त्याप्रसंगी वादी व प्र.वादी नं. १, २ यांनी एकमेकांना सह्या, संमत्या अशा देणेच्या आहेत.

३. यातील प्र. वादी नं. ३ व ४ सखुबाई तुकाराम माजगांवकर व जनाबाई दिनकर पाटील यांना वादी व प्र. वादी नं. १, २ यांनी त्यांचे दावा मिळकतीमधील हिस्सेपोटी प्र. वादी नं. ३ यांना रु. १०,०००/- व प्र. वादी नं. ४ यांना रु. १०,०००/- असा मोबदला दिला आहे व त्यांनी दावा मिळकतींमधील आपले हक्क वादी व प्र. वादी नं. १, २ यांना सोडून दिले आहेत.

४. वादी, प्र.वादींनी आपसात तडजोडीप्रमाणे प्रत्यक्ष कृती केली असून त्याचा अंमलदेखील केला आहे.

५. वादी प्रतिवादींनी या दाव्याच्या कामी केलेल्या तक्रारी कायमपणे सोडुन दिलेल्या आहेत.

६. दाव्याचा कोर्ट खर्च वादी, प्र. वादींनी आपआपला सोसणेचा आहे.

येणेप्रमाणे वादी, प्र.वादीचे दरम्यान आपसात तडजोड झाली असून त्याप्रमाणे आपसात तडजोड हुकुमनामा करणेत यावा. येणेप्रमाणे आपसात तडजोड पुरसीस असे.

कागल
दिनांक - १४/०६/२०१४

वादी तर्फे अॅड. वादी नं. १

वादी नं. २

वादी नं. ३

वादी नं. ४

प्र. वादींतर्फे ॲड.

प्र.वादी नं. १

प्र.वादी नं. २

प्र.वादी नं. ३

प्र.वादी नं. ४

"True Copy"

Asstt. Supdt.
Civil Court, J.D., Ka...

Read & Compared by